मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३१८ वा • शुक्रवार, ता. ३० मे २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००



दिसतो साधा कागद, पण असते ती ढाल!

भारताच्या शूर सैन्यदलांनी शत्रूचे एकेक क्षेपणास्त्र वेचून वेचून हाणून पाडले, तसेच आम्ही तुमचे 'फेक न्यूज' आणि अफवांपासून संरक्षण करतो. ही मुद्रित माध्यमाची ताकद आहे. केवळ सत्य - तपासलेले, वस्तुनिष्ठ आणि खात्रीशीर! तेही रोज सकाळी तुमच्या दारात...

मुद्रित माध्यम, विश्वासार्ह माध्यम...

Issued by India's leading newspapers:

महाराष्ट्र टाइम्स | Dainik Bhaskar | Hindustan Times | The Telegraph | EENADU | दैनिक जागरण | अमर उजाला | संदेश

THE TIMES OF INDIA | The Economic Times | नवभारत टाइम्स | विजय कर्नाटक

दिव्य भास्कर | दिव्य मराठी | हिन्दुस्तान | mint | mid-day | नईदुनिया | आनन्दबाजार पत्रिका | हिमालय दर्पण

To get started with your copy of Maharashtra Times, please call 18001200004 or visit subscribe.timesofindia.com


## सरकारी वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहरात नको, कर्जतला द्या

### आ. पवार यांची फडणवीसांकडे आग्रही मागणी



**मुंबई । प्रतिनिधी**

वैभवशाली अहिल्यानगर शहरातील जिल्हा रूग्णालयाच्या जागेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नुकत्याच पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. या निर्णयाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तुतारीवाले आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आभार मानले, पण हे महाविद्यालय अहिल्यानगर शहरात नको तर ते कर्जतला द्या, अशी लेखी मागणी केली.

यावेळी बोलताना आमदार रोहित पवार यांनी लक्ष वेधले की, अहिल्यानगर शहराजवळ वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक ती जमीन उपलब्ध नसल्याने, हे महाविद्यालय कर्जत-जामखेड मतदारसंघात स्थापन करावे. कारण या परिसरात महाविद्यालयासाठी पुरेशी व मोकळी जागा सहज उपलब्ध आहे. मुख्यमंत्र्यांनीही आमदार पवार यांच्या या सूचनेची दखल घेतली असून, मी अर्थमंत्री, वैद्यकीय शिक्षणमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याशी बोलून लवकरच सकारात्मक निर्णय घेईन, असे आश्वासन दिल्याचे आमदार पवार म्हणाले.

राज्य मंत्रिमंडळाने अहिल्यानगर जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या जिल्हा रूग्णालयाच्या जागेवर शासकीय मेडिकल कॉलेज स्थापन करण्याचा निर्णय घेतला. आमदार रोहित पवार यांनी याबाबत मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन अहिल्यानगर शहरीऐवजी कर्जत परिसर सुचवला. कर्जत-जामखेडमध्ये जमीन उपलब्ध असल्यामुळे तेथे महाविद्यालय होणे शक्य, असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक निर्णयाचे आश्वासन दिले.

कर्जत-जामखेड मतदारसंघातील आरोग्य व शिक्षणाच्या दृष्टीने ही मागणी महत्त्वपूर्ण मानली जात असून, वैद्यकीय शिक्षणाच्या संधींसह स्थानिक आरोग्यसेवा सुधारण्याचा मार्ग खुला होऊ शकतो.

## शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन संवाद- मुख्यमंत्री फडणवीस



**परभणी । प्रतिनिधी**

कृषी विद्यापिठांनी प्रमुख पिकांच्या उत्पन्न वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापराचे मॉडेल तयार करण्यासाठी संशोधन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वातावरणीय बदल, कीड व्यवस्थापन तसेच पावसाचा खंड पडल्यानंतरही तग धरू शकणारे वाण शेतकरी बांधवांना उपलब्ध देण्याबाबतचे संशोधन अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्यावतीने आयोजित संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीच्या ५३ व्या बैठकीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. बैठकीस कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यासह वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठाचे कुलगुरू डॉ.इंन्द्र मणि, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख, बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे उपस्थित होते.केंद्र शासनाने राज्यात आयसीआरच्या माध्यमातून सुरु केलेल्या नव्या योजनेत शेतीशी सबंधित विविध शास्त्रज्ञ, या क्षेत्रात कार्यरत संस्था, अधिकारी एकत्रितपणे शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन संवाद साधणार आहेत. शेती क्षेत्राच्या विकासासाठी हाती घेतलेला हा उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठाचे डॉ.मदन पेंडके, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे डॉ.संतोष गहुकर, बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठाचे डॉ.विजय दळवी, महात्मा फुले कृषी विद्यापिठाचे डॉ.सुनील कदम यांचा उत्कृष्ट कृषी संशोधन पुरस्कार-२०२५ देऊन गौरव करण्यात आला.

## 'चुना लावू नये' म्हणून किसानसभेसह शेतकरी कार्यकर्ते ठिकठिकाणी स्थानबद्ध!



**परभणी । प्रतिनिधी**

'पीक विमा योजनेत शेतकऱ्यांनी चुना लावला' या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वादग्रस्त विधानाचा निषेध करत परभणीत कार्यकर्त्यांनी पुन्हा आंदोलन छेडण्याची शक्यता लक्षात घेता आज अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी थेट घरातून व पक्ष कार्यालयातून उचलले. काय घडले नेमके? गेल्या महिन्यात अजित पवार परभणी दौऱ्यावर असताना किसान सभा, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) व इतर कार्यकर्त्यांनी त्यांच्या वाहन ताफ्यावर चुन्याच्या डब्यातील चुना फेकून निषेध व्यक्त केला होता. आज, २९ मे रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस परभणी दौऱ्यावर असताना पुन्हा तसेच आंदोलन होण्याची शक्यता लक्षात घेऊन गंगाखेड, सोनपेठ, ताडकळस, बोरी आणि परभणी शहरातील विविध ठिकाणांहून कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. स्थानबद्ध कार्यकर्त्यांची नावे : कॉ. ओंकार पवार राज्य सहसचिव, किसान सभा. कॉ. शिवाजी कदम अध्यक्ष, गंगाखेड तालुका किसान सभा. कॉ. अरुण हरकळ पदाधिकारी, बोरी तालुका किसान सभा. गोविंद गिरी स्वराज अभियान. अमोल जाधव, प्रदीप सोनटक्के. उमेश देशमुख काँग्रेस कार्यकर्ते. घोषणांनी परिसर दणाणला : ''पीक विमा शेतकऱ्यांचा हक्क आहे'', ''किसान सभा जिंदाबाद'', ''भाकप जिंदाबाद'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनकर्त्यांनी अजित पवार यांचे वक्तव्य शेतकऱ्यांचा अवमान करणारे असल्याचे सांगितले. राज्यभरातून निषेध : या धरपकडीच्या घटनेचा राज्यभरातून तीव्र निषेध व्यक्त होत आहे. पोलिसांनी कोणताही गुन्हा नोंदवलेला नसतानाही कार्यकर्त्यांना स्थानबद्ध केल्याने राजकीय दबावाखाली केलेली कारवाई असल्याचे अनेकांचे मत आहे. आंदोलनाचे कारण : अजित पवार यांचे 'चुना लावला' हे विधान आंदोलनाचे स्वरूप च ु न् या ा च ी प्रतिकात्मक फेक व घोषणाबाजी पोलिस कारवाई २९ मे रोजी सकाळपासून घरांवर धाडी व स्थानबद्धता. राजकीय पक्ष किसान सभा, भाकप, काँग्रेस, स्वराज अभियान निषेध परभणीसह राज्यभरात तीव्र निषेध. रयत समाचारच्या विशेष बातमीसाठी आम्ही संबंधित कार्यकर्त्यांशी संपर्क साधून अधिक माहिती देत राहू. जर तुम्ही या घटनेचे साक्षीदार असाल किंवा तुमच्याकडे अधिक माहिती असेल, आम्हाला जरूर कळवा.

## आणिबाणीत तुरुंगवास भोगणाऱ्यांना लोकसेनानीच म्हटले पाहिजे-डावरे



**बेलापूर । प्रतिनिधी**

तत्कालीन प्रधानमंत्री इंदिराजी गांधी यांनी आपले पद टिकविण्यासाठी १९७५ते ७७ पर्यंत देशात आणिबाणी मिसा (डीआरआय) लावून आंतरराष्ट्रीयस्तरावर जगात प्रथम क्रमांकावर असलेल्या आपल्या भारतीय लोकशाहीची हत्या केली. आणिबाणीच्या विरोधात देशातील पन्नास हजार निरापराध अठरा महिने तुरुंगवास भोगणाऱ्या राजबंदीना लोकसेनानीच म्हटले पाहीजे, असे प्रतिपादन पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार विष्णुपंत डावरे यांनी केले.

बेलापूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पहिल्या पिढीचे शिलेदार गंगाधरशास्त्री बद्रीनारायणजी साळूंके प्रतिष्ठानाच्या वतीने बेलापूर येथील आझाद मैदानावर आयोजित केलेल्या सर्वरोग आरोग्य चिकित्सा शिबीर व पाणी तपासणी शिबीराच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रणजीत श्रीगोड तर अतिथी म्हणून जि.प.सदस्य शरदराव नवले, कृषी उपन्न बाजार समितीचे उपसभापती अभिषेक खंडागळे, अशोकनाना साळुंकेहोते. प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. अजिंक्य व ॲड. मयूर साळुंके यांनी प्रतिष्ठानच्या सेवाकार्याची माहिती देवून घेतलेल्या शिबीरात सुमारे ४०० रुग्णांनी लाभ घेतला तर पाणी तपासणी शिबीरात ७५ शेतकऱ्यांनी आणलेल्या पाण्याच्या नमुन्यावर प्रात्याक्षिकाव्दारे मार्गदर्शन केले.

यावेळी बेलापूरचे प्रथम न्यायाधिश दाम्पत्य श्री व सौ. शैलेश सातभाई यांचा सन्मान विधिज्ञ ॲड. विजय साळुंके तर पामोसा फाउंडेशनचे डॉ. पाठक सह आलेल्या टिमचा सन्मान प्रदिप साळुंके, भरत साळुंके, प्रताप साळुंके यांनी केला. डावरे पुढे म्हणाले, आपल्या प्रपंचाची राख रांगोळी करुन अठरा महिने तुरुंगवास भोगणाऱ्या राजबंदीची संख्या जिल्ह्यात सर्वात ज्येष्ठ बावीस पैकी स्व.गंगाधरशास्त्री साळुंके हे होते. शिबीरास सुनिल मुथा, रविंद्र खटोड, कृषीतज्ञ रावसाहेब राऊत, पत्रकार देविदास देसाई, जीवन गवळे, विकास अंत्रे, बंड साहेब, रविंद्र गायकवाड, विलासनाना मेहेत्रे, राधेशाम आंबिलवादे, बाबासाहेब काळे, एकनाथ नागले, जाकिर शेख आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. गणेश साळुंके यांनी आभार मानले.

## कॅब ॲग्रिकेटर्स नियमावली नकोच

### टुरिस्ट टॅक्सी चालकांची पोलिस स्थानकावर धडक



**कळंगुट,गोवा । प्रतिनिधी**

२९ राज्यात कॅब ॲग्रिकेटर्स नियमावली सुरू करण्याच्या निर्णयाविरोधात स्थानिक टुरिस्ट टॅक्सी चालक मालक यांनी आंदोलन केले. या नियमावलीचा विरोध करत त्यांनी काल ता.२९ रोजी हणजूण पोलिस स्थानकावर धडक दिली. पोलिसांनी आंदोलकांना गेटवरच अडवल्यामुळे वातावरण तणाव निर्माण झाला होता. सरकारकडून हजारो स्थानिक टॅक्सीचालकांना खासगी कंपन्यांच्या गुलामगिरीखाली आणण्याचा घाट घातला जात आहे.

मात्र, स्थानिक टुरिस्ट टॅक्सी चालक तसेच मालक सरकारचा हा डाव पूर्ण ताकदिनिशी उधळून लावणार असल्याचा इशारा टॅक्सी चालक संघटनेचे नेते योगेश गोवेकर यांनी दिला. हणजूण पोलिस स्थानक इमारत परिसरात मोठ्या संख्येने जमलेल्या टॅक्सीचालकांना येथील मुख्य दरवाजाकडेच पोलिसांनी अडवून ठेवले होते.

येथील पोलिस निरीक्षक सूरज गावस यांनी स्वतः गेटपाशी येत टॅक्सीचालकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. आंदोलनकर्त्या प्रमुख पाच नेत्यांना बोलावून आपल्या ऑफिसमधे संवाद साधला. यावेळी परिसरात मोठ्या प्रमाणात टॅक्सीचालक ठाण मांडून बसले होते. दरम्यान, योगेश गोवेकर यांना अटक होणार असल्याची अफवा पसरल्यानेही टुरिस्ट टॅक्सीचालक आक्रमक बनले. यावेळी शिवोली काँग्रेस गट समितीच्या अध्यक्ष पार्वती नागवेकर, कपिल कोरगावकर तसेच अन्य पदाधिकारी टॅक्सी चालकांसमवेत हणजूण पोलिस स्थानकात उपस्थित होते.

## लग्न दहावा आणि राजकीय पुढारी

वैष्णवीच्या लग्नात राजकीय नेते दिसल्याने हा विषय पुन्हा एकदा पुढे आलाय. पूर्वी लग्न साखरपुडा,अंत्ययात्रा,दहावा, वर्षश्राद्ध हे पूर्णपणे कौटुंबिक विषय होते.फक्त जवळचे नातेवाईक व गावकरी त्याला यायचे. हळूहळू नवश्रीमंत आणि राजकारणात असलेल्या व्यक्तींनी आपली प्रतिष्ठा वाढवायला गर्दी जमवायला सुरुवात केली. त्याचा इव्हेंट केला आणि हजार ते पाच हजार,दहा हजार लोक जमवायला सुरुवात केली. त्या जमणाऱ्या गर्दीतून त्या व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा ठरायला लागली. त्याचे सामाजिक स्थान नक्की व्हायला लागले... जर गर्दी जमणार आहेच तर मग राजकीय नेते त्यात का नकोत? त्याने आपली प्रतिष्ठा अजून वाढेल असा हे लोक विचार करायला लागले आणि ते मग राजकीय नेते आलेच पाहिजे यासाठी टोकाचे प्रयत्न करायला लागले...अगदी लग्नाची तारीख ठरवताना , साहेब तुम्हाला कधी जमेल यातून तारीख ठरवणारे आहेत..लग्नाच्या आदल्या दिवसापासून हे वधुपिता आणि वरपिता त्या नेत्यांना सतत फोन करतात. जवळच्या कार्यकर्त्यांना सारखे साहेबांना घेऊन या असा आग्रह धरतात..जमलेल्या गर्दीकडे त्यांचे लक्ष नसते त्यांचे डोळे लग्नघटिका जवळ येताना फक्त नेत्यांकडे असते...मंत्री आल्यावर सुरू असलेले लग्न थांबवले जाते आणि आशीर्वाद दिले जातात व मंत्री गेल्यावर लग्न पुन्हा सुरू होते...सर्व पक्षाचे नेते आशिर्वादाचे भाषण करतात..मला प्रश्न पडतो की बाकीचे लोक काय शाप द्यायला आलेले असतात की काय ? पत्रिका देताना मुलीचा मुलाचा बाप अगदी तुम्ही आलेच पाहिजे असा आग्रह धरतो पण मांडवात आलेल्या सामान्य माणसाकडे तो बघतही नाही.. त्याच्यासाठी सत्कार आणि भाषण यासाठी फक्त नेते महत्वाचे असतात... एकवेळ लग्न समजू शकतो..तो आनंदाचा सोहळा आहे.. पण दुःखातही हेच घडते. दहावा हा खरे तर पूर्वी नातेवाईकांचा विधी असायचा. आता त्याच्या पत्रिका छापल्या जातात. त्या मोठ्या प्रमाणात वाटल्या जातात.... नेत्यांनी यावे म्हणून आग्रह धरला जातो.. दहाव्याच्या सकाळी त्या कुटुंबातील व्यक्ती नेत्यांना कोणताही संकोच न करता फोन करतात...जवळच्या कार्यकर्त्यांना फोन करून साहेबांना घेऊन या असा आग्रह धरतात..आपण दुःखात आहोत ,आपण अशा गोष्टी करायला नको याची कोणतीही संवेदना नसते.... दहाव्यात प्रवचन संपले की मग श्रद्धांजली भाषणे सुरू होतात..अनेकदा त्या व्यक्तीच्या आई वडिलांवर बोलण्यासारखे काही नसते..मग नेते त्यांचा पुत्र किती कर्तृत्ववान आहे यावर बोलणे सुरू करतात..२५ पेक्षा जास्त भाषणे होतात..आणि लोक त्या उन्हात वैतागून जातात..शेवटी उठून जाऊ लागले की मग भाषणे थांबतात... लग्न असो की दहावा,वर्षश्राद्ध नेते ही त्यात आपले मार्केटिंग करू लागलेत. अगदी काही प्रयत्न न करता जर हजारो लोक भेटत असतील,भाषण करता येत असेल तर ती संधी नेते घेऊ लागले. अगदी नेते सकाळीच निघतात. जे कार्यकर्ते फार महत्वाचे नाहीत.त्यांच्या लग्नात फक्त भेटी देतात व जिथे प्रचंड गर्दी जमणार आहे तिथे बरोबर लग्नाची वेळ साधतात... नेत्यांच्या हे लक्षात आले आहे की आता गावाचे काम नाही केले तरी चालेल फक्त त्या गावातील जो बोलणारा वर्ग आहे,जे प्रमुख कार्यकर्ते आहेत त्यांच्या घरचे लग्न,दहावा, वर्ष श्राद्ध, वाढदिवसाला फक्त हजेरी लावली की तो वर्ग आपल्या भ्रष्टाचाराविषयी बोलत नाही, गावचा रस्ता,पाणी,रोजगार यावर प्रश्न विचारत नाही...तेव्हा नेत्यांनी त्यांची कार्यपद्धती बदलली आहे...काम करण्यापेक्षा फक्त व्यक्तिगत संबंध फक्त जपले की झाले. पंतप्रधान क्रिकेटपटू,उद्योजक यांचे लग्नात जातात..मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,आमदार ,मंत्री ते च करतात..हा व्यक्तिगत नात्याचा खर्च शासकीय तिजोरीतून केला जातो पण त्याबाबत त्यांना कोणी प्रश्न विचारत नाही... शासकीय अधिकारीही असेच झालेत. त्यांना हे माहीत झाले आहे की गावातील प्रमुख नेते,पत्रकार,प्रमुख व्यक्ती,जातीचे नेते एकदा सांभाळले, ते आल्यावर चहा सांगितला की मग सामान्य माणसाला लाथा घातल्या तरी चालतात...आणि कितीही भ्रष्टाचार केला तरी चालतो हा बोलका वर्ग साहेब खूप चांगले आहेत ही क्लीन चीट देत असतो... नेते आणि अधिकारी यांचा हा नवा पॅटर्न यासाठी वाईट आहे की यातून समूहाचे प्रश्न गरीबांचे प्रश्न सोडवण्याची त्यांना गरज वाटत नाही..बोलक्या वर्गाचा अहंकार सुखावून त्यांचे कार्यक्रमाला जाऊन सामान्य माणसाच्या प्रश्नाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करायला नेते शिकले आहेत...त्यामुळे हे जास्त घातक आहे....नवरा नवरी शेजारी हसत उभे असलेले नेते यामागे इतकी वेदना लपली आहे... त्यामुळे गावोगावी लग्न आणि दहावा यातील भाषणे बंद करण्याची चळवळ व्हायला हवी म्हणजे मग नेते तिकडे फिरकणार नाही...



**हेरंब कुलकर्णी**

# प्रा. रवींद्र काळाने यांना डॉक्टरेट



**श्रीगोंदा । विजय मते**

तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा इंजिनिअरिंग कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.रवींद्र काळाने यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मध्ये शारीरिक शिक्षण (महाराष्ट्रातील शालेय स्तरावरील बेसबॉल खेळाडूंच्या मूल्यमापनासाठी कसोटीचे विकसन व प्रामाणिकरण करणे) या विषयात डॉक्टरेट ही पदवी मिळाली आहे. हि पदवी प्राप्त करण्यासाठीं त्यांना डॉ.नल्ला भास्कर रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते,परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा पाचपुते, सचिव विक्रम पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रताप बबनराव पाचपुते, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.अनिल पुंड, अकॅडमी डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते,अकॅडमीचे डायरेक्टर प्रा.डॉ.संजीव कदम, प्राचार्य मोहन धगाटे,प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ, प्रा.डॉ.सुदर्शन गिरमकर,प्राचार्य डॉ.रमेश शिंदे,प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे, प्राचार्य.डॉ.प्रशांत सूर्यवंशी आदींनी अभिनंदन केले.

# बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचा शुभारंभ



**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर दक्षिण जिल्हा अंतर्गत नगर तालुक्याच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक न्यू टिळक रोड अहिल्यानगर या ठिकाणी जिल्हा शाखा, शहर शाखा व तालुका शाखेच्या सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत १० दिवसीय बौद्धाचार्य श्रामनेर शिबिराचे नगर तालुका अध्यक्ष आयु. नितीन शिवाजी साळवे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले व बौद्धाचार्य श्रामणेर शिबिरार्थींना चिवरदान करून त्रिशरण पंचशील देताना राष्ट्रीय सचिव भिख्खू महासंघचे भंते ए. सुमेधबोधि, केंद्रीय शिक्षक ए. जी. तायडे गुरुजी, जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सरचिटणीस सतीश ओहोळ, कोषाध्यक्ष विजय हूसळे, उपाध्यक्ष भगवंत गायकवाड, उपाध्यक्ष संतोष गायकवाड, जिल्हा प्रभारी धोंडीबा राक्षे, राहुल कांबळे, केंद्रीय शिक्षक अण्णा गायकवाड, सचिव गोरख केदारे, सचिव किशोर कांबळे, नगर शहराध्यक्ष बौद्धचार्य दीपक पाटोळे, सरचिटणीस गौतम पाचरणे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, उपाध्यक्ष लक्ष्मण माघाडे, अरुण गायकवाड, प्रकाश कांबळे, बाबासाहेब धीवर, विशाल गायकवाड, संजय केदारे, सुनील पंचमुख, संतोष जाधव, सुनील गायकवाड, सावित्रा हाबू, संतोष गायकवाड, मिलिंद आंग्रे, विजीत ठोबे आदीसह जिल्हा व शहर कार्यकारणी उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये पुढील १० दिवस शिबिर संपन्न होत आहे. सर्व कार्यकारिणी यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ गतिमान करणे व बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करण्याचे उद्दिष्ट सफल करण्याचे कार्य तालुका पदाधिकारी करत असुन अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यात नगर तालुक्याने राबवलेले शिबिर अत्यंत उल्लेखनीय पद्धतीने संपन्न होत आहे. शिबिर यशस्वी करण्याकरिता सर्वच पदाधिकारी यांचा प्रयत्नांना यश म्हणून २३ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला आहे.

# शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा हे नगरकरांचे वैभव- देशमुख

## अहमदनगर शहराचा ५३५ वा स्थापनादिन साजरा



**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर शहराचा ५३५ वा स्थापना दिवस बुधवारी ता. २८ मे रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. नगरकरांच्या वतीने शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर चादर अर्पण करण्यात आले. हाजी अजीजभाई चष्मावाला सामाजिक प्रतिष्ठान, मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी कविता, देशभक्तीवरील गीत, शायरी व मुशायराने बागरोजा येथे मैफल रंगली होती. राष्ट्रीय किर्तीच्या शायरा कमर सुरुर यांनी शायरी व मुशायरा सादर केला. एक लम्हा समझकर यू भूल जाना ना मुझे... सदिया जुडी हुई हे मेरे दास्तान से! ही शायरी अहमद बादशाह यांच्यावर सादर करण्यात आली. शायरी, कविता व मुशायराच्या जुगलबंदीचा आनंद उपस्थित नगरकारांनी लुटला. या अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी हाजी अजीजभाई चष्मावाला प्रतिष्ठानचे हाजी मन्सूरभाई शेख, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाचे अभिजीत वाघ, पत्रकारांच्या नाशिक विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य विजयसिंह होलम, डॉ. कमर सुरुर, संध्या मेढे, अन्सार सय्यद, आसिफ शेख, आर्किटेक फिरोज शेख, जुनेद शेख, नवेद शेख, अल्तमश जरीवाला, आसिफ खान, शफाकत सय्यद, सलीम सहारा, नईम सरदार, फिरोज शेख, अल्ताफ शेख, महबूब सय्यद, वाहिद शेख, अबुजर सय्यद, रमिझ शेख, मोसीन शेख, फैय्याज शेख, हमजा शेख आदींसह इतिहास प्रेमी, पत्रकार, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूषण देशमुख यांनी शहर स्थापनेपासून ते आज पर्यंतच्या ऐतिहासिक घटनांना उजाळा दिला.

शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा हे नगरकरांचे वैभव असून, अहमद निजामशहाच्या दूरदृष्टीमुळे आपल्याला हे वैभवशाली शहर लाभल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जगात फार कमी शहरे अशी आहे, ज्यांचा स्थापना दिवस माहिती आहे, त्यापैकी एक अहमदनगर शहर असून, संस्थापक अहमद निजाम शहा यांनी २८ मे १४९० रोजी वसविले. या कार्यक्रमातून शहराच्या वैभवशाली इतिहासाला उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उबेद शेख यांनी केले. आभार भैरवनाथ वाकळे यांनी मानले.

# दहावी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील महत्वाचा वळणबिंदू- देशमुख

## डॉ. पाउलबुधे विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**अहमदनगर । विजय मते**

दहावीच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर काही विद्यार्थ्यांना आनंद झाला तर काहींच्या पदरी निराशा प्राप्त झाली.अशी परिस्थिती असली तरी विद्यार्थ्यांच्या स्वप्नाला आभाळ ठेंगणे वाटते, तर अपयशाच्या सीमेवर पुन्हा पुरवणी परीक्षा देऊन स्वतःच्या जीवनाचा मार्ग नव्याने शोधण्याच्या तयारीत विद्यार्थी असतात.दहावी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील एक महत्त्वाचा वळणबिंदूअसतो. असे प्रतिपादन सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव रामकिसन देशमुख यांनी केले. वसंत टेकडी येथील डॉ. ना.ज.पाऊलबुधे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १०वी,१२वी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार प्रा दादासाहेब भोईटे,संकुल प्रमुख प्राचार्या डॉ. रेखाराणी खुराणा, प्राचार्या विजया नवले, सुनिता त्रिंबके, वैशाली शिर्के, माजी शिक्षक राजेंद्र मोरे, प्रा.रंगनाथ वाघ, प्रा. रोहिदास चौरे, लक्ष्मण बेळगे अंबादास शिंदे, घनश्याम सानप,विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी देशमुख म्हणाले अकरावी प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे या टप्प्यावरच विद्यार्थ्यांचे पुढचे शिक्षण, करियर आणि व्यावसायिक आयुष्याची दिशा ठरते. त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांच्या कला, गुणा चे आवडीनुसार पुढील शिक्षणाची निवड करताना चा निर्णय विचारपूर्वक घ्यावा. असे आवाहन केले. प्रा. दादासाहेब भोईटे म्हणाले पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे निरीक्षण करावे,त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधावा, त्यांची आवड निवड लक्षात घेऊनच उज्वल भविष्याची दिशा ठरवावी, मुलांच्या बुद्धिमत्तेचा विचार त्यांच्या कलाचा आदर करावा. त्यांना केवळ जीव घेण्या स्पर्धेत न ढकलता आनंदाने शिकण्याचा, शिकता शिकता, जगण्याचा मार्ग प्रशस्त करण्याचा प्रयत्न पालकांनी करावा. प्राचार्य विजया नवले यांनी प्रास्ताविकात सेवा शिक्षण मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचा तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचा सातत्याने प्रयत्न असतो. शिक्षकांचे अथक परिश्रमाला विद्यार्थ्यांच्या कष्टाची जोड मिळाल्याने या विद्यालयाचा निकाल १००टक्के लागलेला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयाचा नावलौकिक वाढत आहे बारावीच्या विज्ञान शाखेतील ओम सानप विद्यार्थ्यांने परीक्षेत यश तर मिळविले शिवाय मल्लखांब स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला आहे. सुत्रसंचलन दिपक परदेशी यांनी केले तर आभार विष्णु मगर यांनी मानले.



# महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर संयुक्त बैठक

## धरणे आंदोलन स्थगित

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिका कामगार युनियनने प्रलंबित मागण्यांसाठी दिलेल्या धरणे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन व युनियन पदाधिकाऱ्यांची ता. २७ मे रोजी संयुक्त बैठक झाली. उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. यामध्ये कोर्ट कर्मचाऱ्यांचे वेतन आयोग फरक, हद्दवाढीतील कर्मचाऱ्यांचे तक्ते, ६व्या वेतन आयोगाचे शिल्लक हप्ते, वैद्यकीय प्रतिपूर्ती, निवृत्ती वेतन अंशदान, पदोन्नती, एल.जी. एस. परीक्षा, घरे व इतर अनेक मागण्यांबाबत कार्यवाहीचा निर्णय घेण्यात आला.

प्रशासनाच्या आश्वासनानंतर युनियनने २८ मेपासून सुरू होणारे बेमुदत धरणे आंदोलन स्थगित केले आहे.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपायुक्त विजयकुमार मुंडे, लेखाधिकारी सचिन धस, सहाय्यक आयुक्त तथा आस्थापना प्रमुख मेहेर लहारे, प्रकल्प अभियंता राजेंद्र मेहेत्रे, मनपा लेखा विभागातील कर्मचारी अनिल लोंढे, तसेच युनियनच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र सारसर व बाबासाहेब मुदगल, आनंदराव वायकर, महादेव कोतकर, बाबासाहेब राशिनकर, राहुल साबळे, नंदुकुमार नेमाणे, विठ्ठल उमाप, अनंत लोखंडे इत्यादींनी संयुक्त बैठकीमध्ये सहभाग घेतला होता.

# समाजहितासाठी युवकांनी एकत्र येणे ही काळाची गरज- श्रीगोपाल धुत



**अहमदनगर । राजू खरपुडे**

माहेश्वरी सभा व माहेश्वरी युवा संघटन यांच्या वतीने श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटीच्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रामकृष्णचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धुत, चेअरमन किसन बंग, व्हा.चेअरमन राजेंद्र मालू आदींसह नवनिर्वाचित सदस्य तसेच माहेश्वरी सभेचे मुकूंद धुत, सुरेश चांडक, अतुल डागा, सुरेश सिकची, विनोद मालपानी, संजय भक्कड, जवाहरलाल मंत्री, रामेश्वर मनीयार, मयुर मनीयार, माहेश्वरी युवा संघटनचे शाम भुतडा, विशाल झंवर, अनिकेत बलदवा, सुमित चांडक, मनिष नावंदर, प्रणव बिहाणी, अभिनंदन कालानी, पियुष झंवर, भुषण काबरा आदी उपस्थित होते. याप्रसंगी श्री रामकृष्ण अर्बनचे संस्थापक श्रीगोपाल धुत म्हणाले, माहेश्वरीच्या माध्यमातून समाजातील युवकांना नेतृत्वाची संधी मिळते आहे. समाजहितासाठी युवकांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. श्री रामकृष्ण क्रेडीट सोसायटीच्या नव्या संचालक मंडळाकडून नेहमीच सहकार्य केले जाईल तसेच भविष्यातही समाजहितासाठी एकजूट ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नगर तालुका माहेश्वरी सभेचे मुकुंद धुत यांनीही आपल्या मनोगतात सांगितले की, माहेश्वरी सभा ही समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. श्री रामकृष्ण सोसायटीच्या नव्या संचालक मंडळाचे नेतृत्वचा अभिमान वाटतो. समाजाच्या एकतेतूनच प्रगती शक्य आहे. युवकांनी समाजातील गरजांवर लक्ष केंद्रित करून सेवाभाव ठेवावा आणि आपले कर्तव्य पार पाडावे.यावेळी युवा संघटनचे शाम भुतडा म्हणाले की, आमच्या युवा शक्तीच्या मागे नेहमीच श्रीरामकृष्ण अर्बनचे सहकार्य मिळत असते. त्यामुळे युवकांना काम करण्यासाठी नवी दिशा, उर्जा प्राप्त होते. यापुढेही नवनिर्वाचित संचालक मंडळ आमच्या मागे उभे राहिल असे आम्ही अपेक्षा व्यक्त करतो. याप्रसंगी राजेंद्रकुमार कंत्रोड, विश्वनाथ कासट, राजेंद्र गुजराथी, प्रकाश गांधी, ओमप्रकाश चांडक, लक्ष्मीकांत झंवर, सुधीर झालानी, अनुराग धुत, प्रदिप पंजाबी, ॲड.अशोक बंग, गोपाल मनीयार, मधुसूदन सारडा, साईनाथ कावट, देवराव साठे, राजकमल मनीयार, शोभा राठी, अनुरिता झगडे आदी संचालक उपस्थित होते. चेअरमन किसन बंग यांनी आभार मानले.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# युवाशक्तीचे आत्मबळ म्हणजेच यशाची गुरुकिल्ली- बिपीन कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**

आजची युवाशक्ती ही हुशार, तंत्रस्नेही आणि प्रगतीची भूक असलेली आहे. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी युवकांनी आत्मशक्ती, स्वयंशिस्त आणि स्पष्ट ध्येय ठेवून प्रयत्न केले तर यश अटळ आहे, असे प्रेरणादायी मत संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी व्यक्त केले. संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित रोजगार मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.




या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक युवकांना बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळाली. कारखान्याच्या कार्यस्थळावर बुधवारी झालेल्या या नोकरी महोत्सवाचे उद्घाटन क्रेडाईचे अध्यक्ष आणि उद्योजक राजेश ठोळे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष असून, ग्रामीण भागातील तरुणाईसाठी तो एक मोठा आशेचा किरण ठरत आहे. उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे, पराग संधान व सिद्धार्थ साठे यांनी उपस्थितांचे स्वागत करत प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. उद्घाटनप्रसंगी बोलताना राजेश ठोळे म्हणाले, ''कोपरगावसारख्या ग्रामीण भागात पुणे-मुंबईतील नामवंत कंपन्यांचे प्रतिनिधी आणून येथील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा विवेक कोल्हे यांचा दृष्टीकोन खरोखरच स्तुत्य आहे.'' यावेळी बिपीन कोल्हे म्हणाले, ''सुशिक्षित बेरोजगारांनी आत्मविश्वासाने प्रत्येक संधीचा सामना करावा. ज्ञान, चिकाटी आणि अनुभव यांच्या जोरावरच नोकरी मिळते. आपण जे जे शिकले, ते प्रत्यक्ष आयुष्यात उतरवले पाहिजे. ग्रामीण भागातील मुलामुलींमध्ये जिद्द आहे, म्हणूनच त्यांनी शहरी युवकांशी स्पर्धा करताना कोणतीही भीती बाळगू नये.'' ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांमुळे स्टार्ट-अप ला चालना मिळाली असून, युवकांसाठी उद्योजकतेचे नवे दरवाजे खुले झाले आहेत.

नोकरी मिळाली नाही म्हणून निराश होऊ नये, प्रयत्न करत राहिल्यास यश नक्की मिळते. आज भारताचे आणि भारतीय युवाशक्तीचे कौशल्य पाहून संपूर्ण जग भारावून गेले आहे. संजीवनीने ग्रामीण भागातील पहिले बीपीओ कॉल सेंटर सुरू करून रोजगार निर्मितीत महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे,'' असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी भाजप तालुकाध्यक्ष विशाल गोर्डे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी कारखान्याचे संचालक बाळासाहेब वक्ते, साखर सरव्यवस्थापक शिवाजी दिवटे तसेच विविध संस्था, खातेप्रमुख व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बाबूजी आव्हाड महाविद्यालय व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्यात सामंजस्य करार

**पाथर्डी । प्रतिनिधी**

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी करारावर स्वाक्षरी केली. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करियर कट्टा उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर विविध कार्यक्रम राबविले जातात. विदयार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षाबाबत सखोल मार्गदर्शन केले जाते.

या उपक्रमाचा विस्तार आणि अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याचा उद्देशाने पुणे विभागातील करियर कट्टा संलग्न महाविद्यालयाची सहविचार सभा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय,पुणे येथे नुकतीच पार पडली. या सभेचे उद्घाटन युजीसी-एम एम टी टी सी चे संचालक डॉ.संतोष केंद्रे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ.नितीन घोरपडे व अहिल्यानगरचे प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतिष चंद्र सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.राजधर टेमकर, प्राचार्य भाऊसाहेब देशमुख,विभागीय समन्वयक डॉ. संजय खिलारे जिल्हा समन्वयक डॉ नवनाथ नांगरे व डॉ भागवत परकळ महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक डॉ किरण गुलदगड, डॉ अभिमन्यू ढोरमारे व इतर मान्यवर उपस्थित होते. या सामंजस्य करारामुळे विविध देशातील मराठी उद्योजकांच्या मार्गदर्शनाचा फायदा बाबूजी आव्हाड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना होणार आहे.अशी माहिती डॉ. बबन चौरे यांनी दिली. दोन्ही संस्थांमधील या सामंजस्य काराराद्वारे करियर कट्टा अंतर्गत विद्यार्थी केंद्रित उपक्रमांना अधिक गती देण्याच्या या विशेष प्रयत्नांबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड,उपाध्यक्ष ॲड. सुरेश आव्हाड व सर्व कार्यकारणी सदस्य यांनी प्राचार्य डॉ बबन चौरे,करियर कट्टा समन्वयक डॉ.किरण गुलदगड व डॉ.अभिमन्यू ढोरमारे यांचे अभिनंदन केले.

# शेतकरी आणि त्याला सहकार्य करणाऱ्या कृषी सहाय्यकाला प्रतिष्ठा कधी

## वनवास कधी संपणार?

**अहमदनगर । राहुल साठे**

प्रभू श्रीरामचंद्रांचा वनवास १४ वर्षानंतर संपला होता परंतु १४ वर्ष होऊनही कृषी सहायकांचा वनवास अजून संपलेला नाही आपला भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि या कृषिप्रधान देशातच जे कृषीसाठी काम करतात त्यांना अतिशय अन्यायकारक/सापत्न अशा वागणुकीला सामोरे जावे लागत आहे. शासनाच्या ज्या ज्या कृषी विभागाच्या योजना असतील नवीन तंत्रज्ञान माहिती असेल ते शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवण्याचे काम एक कृषी सहाय्यक करत असतात म्हणून शेतकरी आणि शासन यांच्यातील दुवा हे कृषी सहायक असतात. शेतकऱ्यांच्या कोणत्याही कृषीविषयक असलेल्या अडचणी असतील किंवा योजना असतील ते कृषी सहाय्यक शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत घरोघरी जाऊन माहिती देतात योजनेचा प्रचार प्रसार करतात हे करत असताना त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते पण तरीही हा कृषी सहाय्यक न डगमगता काम करत राहिलेला आहे आणि करतोय. गेली १४ वर्षापासून शासनाकडे ते सोयी सुविधा मागत आहेत परंतु शासन त्यांना फक्त आश्वासने देऊन त्यांच्याकडून प्रचंड प्रमाणात काम करून घेत आहे त्यांचा समकक्ष असलेला ग्राम स्तरावरील तलाठी, ग्रामसेवक यांना शासनाने सर्व सोयी सुविधा दिलेल्या आहेत परंतु कृषी सहाय्यक गेली १४ वर्षापासून त्यांच्याकडे मागणी करत आहे, परंतु शासन त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे गेली १४ वर्षापासून सर्व कृषी सहाय्यक संयम धरून होते परंतु आता सर्वांचा संयम संपला आहे कारण गाव पातळीवर कृषी सहायकांना चार ते पाच गाव असतात त्या चार ते पाच गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी त्यांना शासनाने कसलीही सोयीसुविधा दिलेली नाही जर ग्रामसेवकांना मदतनीस असेल तलाठ्यांना कोतवाल असेल तर कृषी सहाय्यकांना शासन का बर मदतनीस देत नाही हे एक न उलगडलेलं कोड आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्व काही कामे ऑनलाईन झाली असल्याकारणाने कृषी सहाय्यक खिशातून पैसे घालून बाहेरून कामे करून घेत आहे. आत्तापर्यंत अनेक कृषिमंत्री होऊन गेले आश्वासने देऊन गेले परंतु सर्वांनी कृषी सहायकांना वाटाण्याच्या अक्षदा दाखवल्या, फक्त आश्वासने दिली जातात परंतु त्या पाळल्या जात नाहीत.



इतकी वर्ष संयमात राहिलेला कृषी सहाय्यक आता बेमुदत संपावर गेले आहे त्यामुळे गाव पातळीवरील सर्व कामे ठप्प झालेले आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून आणि कृषी सहाय्यक हे शेतकऱ्यांचीच मुले असल्यामुळे त्यांनी आता झालेल्या पावसाचे पंचनामे ही करून दिले आहेत. शासनाचे महत्त्वकांशी योजना जसे पीएम किसान ॲग्री स्टॅक योजना इत्यादी योजनेमध्ये कृषी सहायकांनी रात्र आणि दिवस एक करून शेतकऱ्यांना योजनेचा लाभ भेटण्यासाठी काम केले आहे. एवढे काम करूनही कृषी सहाय्यकावर अन्याय का? याचे उत्तर कोणीच देऊ शकले नाही.

**कृषी सहायकांच्या मागण्या**

**पदनाम बदल सहाय्यक कृषी अधिकारी पदनाम करावे, लॅपटॉप मागणी, कृषी मदतनीस मिळावा, कृषी विभागाचा आकृतीबंध तात्काळ लागू करावा त्यामध्ये कृषी पर्यवेक्षकांची संख्या वाढवावी, समान काम समान वेतन यानुसार कृषी सेवक यांना नियमित कृषी सहाय्यक करावे, शासनातर्फे आलेल्या निविष्ठा वाटप करण्यासाठी निधीची तरतूद करावी, नैसर्गिक आपत्तीमध्ये पंचनामे संदर्भात सर्व विभागांना त्यांच्या जबाबदाऱ्या ठरवून देणे.**



# अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेसह पगारबंदीला स्थगिती

## शिक्षक भारतीच्या पाठपुराव्याला यश

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

राज्यातील सर्व अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला शासनाने तूर्त स्थगिती दिली आहे. जिल्हा परिषदेच्या संदर्भात न्यायालयीन आदेश झाल्यानंतरही समायोजनाची प्रक्रिया सुरू होती. समायोजनास नकार दिलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे पगारही थांबवण्यात आले होते. याबद्दल शिक्षण संचालक यांनी संचमान्यता, समायोजन आणि पगार बंदीला स्थगिती देण्याचे स्पष्ट आदेश जारी केले आहेत. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासंदर्भात माजी आमदार कपिल पाटील, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे आणि कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांची भेट घेऊन, न्यायालयीन आदेशानंतरही समायोजन प्रक्रिया सुरू असल्याचे, पगार थांबवण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. आरटीई कायद्यातील तरतुदी आणि महाराष्ट्र राज्य सेवा शर्ती नियमावली १९८१ यांच्याशी विसंगत १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय असल्याचेही लक्षात आणून दिले होते. त्यानंतर आता शासनाने संचमान्यता आणि समायोजन प्रक्रिया थांबवल्याचे जाहीर केले आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संबधीत आदेश मुंबईसह लागू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शेकडो शिक्षकांचे पगार बंदीचे संकट तूर्तास दूर झाले आहे. याबद्दल सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव आणि शिक्षण संचालक यांचे आभार मानले आहेत.

शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्यासोबत आज झालेल्या बैठकीत समायोजनाची सगळीच प्रक्रिया थांबवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कोर्टाच्या निर्णयाची अवमान होणार नाही, याबद्दल आदेश देण्यात आले आहेत. मुंबईतील शिक्षकांना मुंबई बाहेर अतिरिक्त करणे आणि वेतन स्थगिती या दोन्ही प्रक्रिया यामुळे तूर्त थांबतील असेही पालकर यांनी स्पष्ट केले.

# असून अडचण, नसून खोळंबा; एसटी स्टँडची झाली दुरावस्था



**पाथर्डी । प्रतिनिधी**

येथील नाईक चौकातील आत्ताच नवीन बांधलेल्या एस टी बस स्टँडची दुरावस्था झाली असून नियोजनबद्ध काम न केल्यामुळे पावसाच्या पाण्याचे तळे साचत आहे. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. यामुळे ''असून अडचण,नसून खोळंबा'' अशी गत सध्या येथील बस स्टँडची झाली आहे. गेल्या सहा वर्षापुर्वी महायुतीचे सरकार असताना स्टँडच्या नवीन ईमारत बांधकामाला मंजुरी मिळाली. मात्र ठेकेदाराने अतिशय संथ गतीने शेडचे बांधकाम केले असून प्रवाशांना बसण्यासाठी अपुरी जागा तसेच ऊन, पाऊस, वारा यापासून रक्षण होणेसाठी पुरेशा प्रमाणात शेड देखील या ठिकाणी नाही. अशा अनेक बाबीमुळे प्रवाशांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. नवीन बसस्थानक सुरु होऊन एक वर्ष ऊलटले तरी या स्थानकात शौचालय न बांधल्यामुळे प्रवाशांसह महीलांची मोठी कुचंबना होत आहे. स्टँडवर जमा होणाऱ्या पावसाच्या पाण्याला भौगोलिक व नैसर्गिक दृष्ट्या ऊतार न दिल्यामुळे स्थानकात मोठा खड्डा होऊन थोडा जरी पाऊस पडला की लगेच तळे साचत आहे. बस स्थानकाचे जुने शेड न पाडल्यामुळे तिथे मद्यपी व जुगाऱ्याचा अड्डा बनला आहे. रात्रीच्या वेळी प्रवाशी गाडी न भेटल्याने तिथे थांबला तर पाकिटमार दमदाटी करुन त्याचे पैसे वस्तु काढुन घेतल्या जातात. रात्रीच्या वेळी तिथे थांबने धोक्याचे झाले आहे. एकंदरीत नवीन बस स्थानक प्रवाशांसाठी अडचनीचे ठरत आहे. महामंडळाचे जिल्हा आगार प्रभुखांनी लक्ष घालुन बसस्थानकाची झालेली दुरावस्था दुर करावी अशी मागणी प्रवाशांकडुन होत आहे.

# राष्ट्र सेवा दल राष्ट्रीय सचिवपदी डॉ.सागर भालेराव

## चंदनापुरी-संगमनेरचा गौरव

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

लोकशाही,समाजवाद आणि समता यांसारख्या मूलगामी मूल्यांसाठी कार्यरत असणाऱ्या राष्ट्र सेवा दल या ऐतिहासिक संघटनेच्या राष्ट्रीय सचिवपदी डॉ. सागर भालेराव यांची नियुक्ती झाली असून,ही नियुक्ती संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः चंदनापुरी व संगमनेर परिसरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आता डॉ. सागर भालेराव राष्ट्रीय पातळीवर संघटनेच्या कामकाजात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत. डॉ.सागर भालेराव हे मुंबई विद्यापीठाचे पत्रकारितेचे पदवीधर असून,पत्रकार, लेखक,अनुवादक आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची मोठी कार्यव्याप्ती आहे. छात्रभारती विद्यार्थी चळवळ आणि राष्ट्र सेवा दलात त्यांच्या सक्रिय सहभागामुळे त्यांची विचारशील आणि प्रगल्भ कार्यकर्ता म्हणून ओळख आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून काम करणारे डॉ.सागर भालेराव फुले-शाहू-आंबेडकर विचारांवर आधारित लेखन करत असतात. 'मीडिया फॉर डेमोक्रसी' हा त्यांचा उपक्रम देशभरात खूप गाजला असून,याच्या माध्यमातून त्यांनी माध्यमशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संविधान साक्षरता आणि माध्यम साक्षरतेचा प्रचार व प्रसार केला आहे.या कार्यासाठी त्यांना दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. डॉ.भालेराव यांनी जनकवी शैलेंद्र यांच्या सिनेगीतांवर पीएच.डी. केली असून,त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यासात संशोधनाची ठळक छाप आहे.मलेशिया आणि थायलंड येथील आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी भारतातील राजकीय व सामाजिक प्रश्नांवर आधारित संशोधन सादर केलं आहे.तसेच त्यांच्या लेखनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये स्थान लाभले आहे. अपंगत्व अधिकार,बालसंरक्षण, पर्यावरण,आणि लैंगिक समता यासारख्या विषयांवर त्यांनी संशोधनासोबतच जनजागृती केली आहे.शाहीरी सादरीकरण, कार्यशाळा,प्रशिक्षण शिबिरे आणि क्षेत्रीय अभ्यास दौरे यांच्या माध्यमातून त्यांनी युवकांमध्ये सामाजिक भान आणि सक्रिय नागरिकत्वाची जाणीव निर्माण केली आहे.त्यांनी राजस्थान,उत्तर प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि दिल्ली येथील तरुण कार्यकर्त्यांसोबत काम केल्यामुळे त्यांचा कार्यव्याप्तीचा प्रदेशही व्यापक आहे. डॉ.भालेराव यांच्या या निवडीमुळे राष्ट्र सेवा दलाच्या नव्या नेतृत्वाला नव्या विचारांची जोड मिळेल,असा विश्वास पुरोगामी कार्यकर्ते आणि संघटनेचे सदस्य व्यक्त करत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील आणि महाराष्ट्रभरातील पुरोगामी विचारांच्या संघटनांनी डॉ. भालेराव यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून,ही निवड सामाजिक चळवळीत योगदान देणाऱ्या नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



# 'शुभ'मन पर्वास सुरुवात

भारतीय क्रिकेट संघ पुढील महिन्यात इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. २० जून पासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यापूर्वी भारताचे आधारस्तंभ असलेले अनुभवी रविचंद्रन अश्विन, रोहित शर्मा आणि विराट कोहली या तिघांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली. भारताचे आधारस्तंभ असलेल्या या त्रिमूर्तीने जवळपास दीड दशके भारतीय क्रिकेटची धुरा वाहिली त्यामुळे या तिघांच्या निवृत्तीनंतर पहिल्यांदाच भारतीय क्रिकेट संघ कसोटी मालिका खेळतोय ते ही इंग्लंड सारख्या बलाढ्य संघाविरुद्ध आणि ते ही त्यांच्याच देशात त्यामुळे या दौऱ्यात भारतीय संघात कोणते खेळाडू असतील ? संघाचा कर्णधार कोण असेल? अश्विन, रोहित आणि विराट या तिघांची जगा कोण भरून काढणार ? असे अनेक प्रश्न क्रिकेट चाहत्यांना पडले होते. या प्रश्नाचे उत्तर निवड समितीने नुकतेच दिले. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. हे करताना त्यांनी नव्या कर्णधाराचीही घोषणा केली. भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार म्हणून युवा फलंदाज शुभमन गिलची निवड केली. युवा शुभमन गिल हाच भारताच्या कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल अशी अपेक्षा होती आणि ती खरी ठरली. मी माझ्या भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते खरे ठरले. शुभमन गिलच्या गळ्यात कर्णधारपदाची माळ टाकून निवड समितीने त्याच्यावर मोठा विश्वास टाकला आहे अर्थात या विश्वासाला तो पात्र ठरेल का ? याचे उत्तर आगामी काळात मिळेलच मात्र त्याच्यावर ही कामगिरी सोपवून निवड समितीने सकारात्मक पाऊल टाकले आहे हे मान्यच करावे लागेल. शुभमन गिल आता २५ वर्षाचा आहे. अवघ्या २५ व्या वर्षी कर्णधारपदाची माळ गळ्यात पडलेला शुभमन गिल हा पहिला खेळाडू नाही या आधी पतौडी, सचिन तेंडुलकर आणि रवी शास्त्री यांनी २५ व्या वर्षी किंवा त्याआधीच कर्णधारपद भूषवले आहे. सचिनकडे तर अवघ्या २१ व्या वर्षीच ही जबाबदारी आली होती. शुभमन गिलने मागील सात वर्षात जी कामगिरी केली त्या आधारेच त्याला भारतीय संघाचे कर्णधारपद मिळाले आहे. मागील सात वर्षातील त्याची कामगिरी चांगलीच नाही तर अविश्वसनियन अशी आहे. या सात वर्षात त्याने फलंदाज म्हणून तर छाप पाडलीच आहे पण कर्णधार म्हणूनही त्याने स्वतःला सिद्ध केले आहे. २०१८ मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली १९ वर्षाखालील भारतीय संघाने विश्वविजेतेपदाला गवसणी घातली होती. या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले होते ते पाहून तेंव्हाच काही जाणकारांनी तो भविष्यात भारताच्या मुख्य संघाचा कर्णधार असेल असे भाकीत केले होते. ते भाकीत आज खरे ठरले. केवळ १९ वर्षाखालील संघाचीच नव्हे तर आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व केले ते पाहता तो भारतीय संघाचे नेतृत्व करण्यास पात्र असल्याचे सिद्ध झाले. सध्या चालू असलेल्या आयपीएलमध्ये त्याने त्याच्या कुशल नेतृत्वाने गुजरात संघाला प्ले ऑफ मध्ये प्रवेश मिळवून दिला. या दरम्यान त्याने फलंदाजीतही चमक दाखवत ६०० च्या वर धावा काढल्या. याच कामगिरीच्या जोरावर त्याला भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपद मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता २० जूनला तो पहिल्यांदा भारतीय संघाचा कर्णधार म्हणून मैदानात उतरेल त्या क्षणापासून भारतीय क्रिकेटमध्ये! शुभ मन पर्व सुरू होईल. शुभमन गिलची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असली तरी त्याच्यासाठी हे पद सांभाळणे सोपे नाही. भारतीय संघाचा कर्णधारपदाचा मुकुट हा काटेरी असतो. तो मुकुट धारण करणे म्हणजे साक्षात निखाऱ्यावरून चालण्यासारखे आहे त्यात शुभमन गिलला जो संघ दिला आहे तो नवखा आहे. या संघात अनेक नव्या खेळाडूंचा समावेश आहे. यातील बहुतेक खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव नाही. बुमरा, पंत आणि के एल राहुल याच खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव आहे त्यामुळे या नव्या खेळाडूंना घेऊन इंग्लंड सारख्या खडतर दौऱ्यावर जाऊन तिथे जिंकणे हे मोठ्या जिकिरीचे काम शुभमनला करावे लागणार आहे. अर्थात या संघाकडे गमावण्यासारखे काही नाही मात्र कमावण्यासाठी खूप काही आहे. शुभमन गिलने जर या नवख्या खेळाडूंकडून त्यांच्यातील सर्वोत्तम खेळ करून घेतला आणि आपल्या कुशल नेतृत्वाने भारतीय संघाला विजय मिळवून दिला तर मोठा इतिहास घडेल. अर्थात इतिहास घडवण्याची क्षमता या संघात आणि नव्या कर्णधारात आहे यात शंका नाही. भारतीय संघास आणि भारतीय संघाचा नवा कर्णधार असलेल्या शुभमन गिल यांस खूप खूप शुभेच्छा!





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# अखेर मुहूर्त सापडला

## नागवडे, जगताप, दरेकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अखेर गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या पक्ष प्रवेशाला पुर्णविराम मिळाला. श्रीगोंदा तालुक्यातील सहकार क्षेत्रातील नेते नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे व कुकडी कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार राहुल जगताप व श्रीगोंदा तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष प्रशांत दरेकर यांनी बुधवार ता. २८ मे २०२५ रोजी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात पक्षप्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते भगवान पाचपुते, नागवडे व कुकडी कारखान्याचे सर्व संचालक उपस्थित होते. गेल्या एक महिन्यापासून श्रीगोंदा तालुक्यातील सहकार क्षेत्रातील नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये वर्तवली जात होती तो योग २८ मे २०२५ रोजी आला. आणि नागवडे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे व कुकडी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार राहुल जगताप व काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रशांत दरेकर यांचा पक्ष प्रवेश सोहळा मुंबई येथे पार पडला. या पक्षप्रवेशामुळे श्रीगोंदा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाची ताकत वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षांमध्ये मागील महिन्यात काँग्रेसचे नेते घनः श्याम शेलार व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला. त्यामुळे श्रीगोंदा तालुका हा जवळपास उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व असणारा तालुका ठरला आहे. दरम्यान आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीपूर्वीच तालुक्याची राजकीय समीकरणे बदलल्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती व नगरपालिका निवडणूकीत मोठी रंगत येणार आहे. दरम्यान माजी आमदार राहुल जगताप यांच्या संपर्क कार्यालयावरील बोर्ड हलवला असुन अजित पवार यांचा फोटो असलेला बोर्ड लावण्यात आला आहे.





# करायला गेले मारुती अन् झाला गणपती

## श्रीरामपूर बाजार समितीत विखे समर्थकांची अवस्था

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

राजीनामे देऊन सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्याचा आटोकाट प्रयत्न पालकमंत्री राधाकृष्ण विखे समर्थक श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील संचालक करीत आहेत. मात्र अतिउत्साहामुळे ते तोंडघशी पडले आहेत. करायला गेले मारुती अन् झाला गणपती अशी म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

घरगुती कारणामुळे काम पाहण्यास वेळ मिळत नाही, म्हणून आम्ही संचालक पदाचे राजीनामे दिल्याचे पालकमंत्री विखे समर्थक नऊ संचालकांनी जिल्हा उपनिबंधकाकडे दिलेल्या राजीनामा पत्रात म्हटले आहे. यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी बाजार समितीच्या अल्प मतातील सत्ताधाऱ्यांना कोरम अभावी धोरणात्मक निर्णय घेण्यास मनाई केली होती. सभापती सुधीर नवले यांनी या सर्व त्या बाबीस उच्च न्यायालयात आव्हान दिले. याप्रकरणी न्यायालयाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्यानंतर सत्ताधारी आठ संचालकांना समितीचे कामकाज पाहण्याचा न्यायालयाने निर्णय दिला. यामुळे विखे समर्थक संचालकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. राजीनामे दिलेल्यांपैकी विखे समर्थक ६ संचालक सुनावणी दरम्यान हजर होते. विखे समर्थक वकिल विनायक होन यांनी सत्ताधार्यांच्या कामकाजावर सुनावणी दरम्यान प्रश्न उपस्थित करत संचालकांनी राजीनामे दिल्याचे सांगितले. यावर सत्ताधारी सुधीर नवले यांचे वकील अँड. राहुल करपे यांनी विखे समर्थक संचालकांनी राजीनामा पत्रात घरगुती कामामुळे वेळ मिळत नाही म्हणून राजीनामे दिल्याच्या मुद्द्याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. न्यायालयाने विखे समर्थक संचालकांची कान उघडनी केली. विखे समर्थक संचालकांच्या बनवा बनवीचे पितळ येथे उघडे पडले. विखे समर्थक संचालकांना यामुळे भ्रमनिराश आले आहे.

### आप्पा, कितीबी समोर येऊ दे त्याला एकटा बास

**आप्पा, कितीबी समोर येऊ दे त्याला एकटा बास असा विखेंना आव्हान देणारा सभापती सुधीर नवले यांचा व्हिडिओ सोशल मीडियातून नवले समर्थकांनी व्हायरल केला आहे. यामुळे मात्र श्रीरामपूर तालुक्यात अनेकांचे मनोरंजन होत आहे. सत्ता स्थापनेपासून सुधीर नवले यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या प्रत्येक कारवाईला न्यायालयाच्या माध्यमातून सडेतोड उत्तर देत आपली सत्ता अबाधित ठेवली आहे. तालुक्यात नवले यांच्या या हिमतीचे चौकात चौकात, कट्ट्यावर आणि नेते पुढारी आणि कार्यकर्त्यात ठिकठिकाणी चर्चा रंगली आहे.**

# आ. तांबे यांची सुधारीत युवा धोरण समिती सदस्यपदी नियुक्ती

**संगमनेर । शफीक बागवान**



महाराष्ट्र शासनाने राज्यातील युवकांसाठी नव्या पिढीच्या गरजांनुसार समकालीन आणि प्रभावी युवा धोरण तयार करण्यासाठी गतीत करण्यात आलेल्या समितीच्या सदस्य पदी आमदार सत्यजीत तांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या २१ सदस्यीय समितीत विधिमंडळाचे सदस्य, विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच राष्ट्रीय आणि राज्य युवा पुरस्कार प्राप्त प्रतिनिधी यांचा समावेश आहे. आ. सत्यजीत तांबे हे सभागृहातील तरुण व अभ्यासू नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

या नव्या धोरणात युवकांसाठी शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि नेतृत्व विकास आदी बाबींचा समावेश करण्यात येणार आहे. या समितीचा कार्यकाल तीन महिन्यांचा असून, या कालावधीत ती राज्यातील विद्यमान धोरणाचा अभ्यास करून, सुधारित धोरणासंदर्भात शासनाला शिफारशी करणार आहे. नव्या धोरणासाठी लागणाऱ्या योजनांची आखणी, त्यासाठीचा वित्तीय आराखडा आणि केंद्र शासनाच्या धोरणांशी सुसंगती यांचाही समावेश या अभ्यासात असेल. दरम्यान, या उच्चस्तरीय समितीवर अभ्यासू आमदार सत्यजित तांबे यांचे निवड झाल्याबद्दल त्यांचे राज्यघरातील पदवीधर मतदारांनी अभिनंदन केले आहे



# श्री भूतनाथ मंदिरात महापूजा संपन्न

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बेळगाव शहर आणि उपनगर परिसरातील एकमेव असलेले आणि जागृत मानल्या गेलेल्या भारत नगर चौथा क्रॉस येथील श्री भूतनाथ मंदिरात महापूजा कार्यक्रम संपन्न झाला. महापूजा निमित्त मंगळवारी होमहवन, पुजा, महाआरती तसेच भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

काल बुधवारी पूजा अभिषेक आणि प्रसाद कार्यक्रम संपन्न झाला. माजी नगरसेवक दिनेश राऊत यांनी सपत्नीक पूजा केली. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमाला राऊळ समाजाचे बंधू-भगिनी तसेच शहापूर वडगाव खासबाग परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ईश्वर टी अॅण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक
पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

# श्री ब्रह्मचैतन्य याज्ञिक पाठशाळेतर्फे ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठी खास प्रशिक्षण शिबीर

**नाशिक । दत्ता जोगदंड**

नाशिक शहरातील प्रसिद्ध श्री ब्रह्मचैतन्य याज्ञिक पाठशाळा यांच्यावतीने वार्षिक याज्ञिक प्रशिक्षण शिबीर २०२५ आयोजित करण्यात आले आहे. ता. २५ मे ते ३ जून २०२५ या दहा दिवसांच्या कालावधीत हे निवासी शिबीर पार पडणार आहे. नव्याने पौरोहित्य शिकू इच्छिणाऱ्या साधकांसाठी हे शिबीर एक अनोखी संधी ठरणार आहे. गेल्या वर्षी मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, बेंगळुरू तसेच महाराष्ट्रातील विविध भागांतील ब्राह्मण बांधवांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता. या सकारात्मक प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर यावर्षीही दहा दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. शिबीरात त्रिकाल संध्याविधी, यज्ञोपवीतधारण विधी, भोजन विधी, गणपती अथर्वशीर्ष, श्री सूक्त, पुरुषसूक्त, शिवमहिम्न स्तोत्र, सत्यनारायण पूजन, नवग्रह मंत्र तसेच घरगुती कुलधर्म व कुलाचार यांच्या शास्त्रोक्त अभ्यासक्रमाचा समावेश आहे. विशेष म्हणजे कोणत्याही वयाची अट नाही, त्यामुळे सर्व वयोगटातील जिज्ञासूंना या ज्ञानसाधनेचा लाभ घेता येणार आहे. ८१०० रुपयांच्या शुल्कात निवासी सुविधा, भोजन, नाश्ता, चहा तसेच अभ्यासासाठी आवश्यक नोट्स उपलब्ध करून दिल्या जातील. या शिबीराचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ब्राह्मण जातीतील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी शास्त्रीय पौरोहित्यकडे वळावे व वैदिक परंपरा जतन करावी, असे आहे.शिबीरात नामांकित गुरुजींची व्याख्याने होणार असून, वैदिक शिक्षणाच्या माध्यमातून धार्मिक आणि सामाजिक योगदान वाढविण्यास हे शिबीर उपयुक्त ठरणार आहे. या पवित्र ज्ञानयज्ञात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी त्वरित नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



सनातन वैदिक ब्राह्मणी परंपरा संवर्धन